स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्र शाखेअंतर्गत 'समाजशास्त्र' विषयात पीएच.डी. (Ph.D.)

पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

"उच्चशिक्षित विवाहितातील वाढता घटस्फोटाचा कल
: एक समाजशास्त्रीय अभ्यास
(विशेष संदर्भ लातूर जिल्हा)"

"A Sociological Study of Growing Trends of
Divorce in Educated Married" (Special Reference Latur District)

संशोधक

वर्षा भूषण कांबळे

एम.ए. (समाजशास्त्र), सेट
उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक

डॉ.एस.पी. गायकवाड

उपप्राचार्य व समाजशास्त्र विभागप्रमुख
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

फेब्रुवारी २०१६

“उच्चशिक्षित विवाहितातील वाढता घटस्फोटाचा कल : एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ लातूर जिल्हा)”

“A Sociological Study of Growing Trends of Divorce in Educated Married” (Special Reference Latur District)

प्रस्तावना :

“A great marriage is not when the perfect couple comes together but it is when an important couple learns to enjoy their differences.”

- Dave Meurar

प्रत्येक समाजात विवाह आणि कुटुंब या दोन सामाजिक संस्था विशेष महत्त्वाच्या असतात. कारण त्यांच्यात ताण-तणाव निर्माण झाल्यास त्याचा परिणाम व्यक्तिच्या कौटुंबिक संबंधावर पडतो. कुटुंब संस्था ही एक प्राथमिक समूह आहे. कुटुंबातच व्यक्तिचे सामाजीकरण होत असते. कुटुंब या संस्थेत काही समस्या निर्माण झाल्यास त्याचा परिणाम प्रत्यक्ष कुटुंबातील सर्व सदस्यांवर होत असतो. म्हणून सामाजिक समस्येचे अध्ययन करीत असताना कुटुंबाच्या समस्येचे अध्ययन करणे आवश्यक ठरते. नागरिकत्व, औद्योगिकरण, आधुनिकीकरण, बदलती सामाजिक मूल्ये, कुटुंबाच्या कार्यात झालेला बदल, समाजातील बदलत असलेल्या स्त्रियांचा दर्जा व भूमिका, व्यक्तिवाद, आधुनिक संपर्कमाध्यमे (विवाहाचे बदलते स्वरूप, विवाहाची ऐच्छिकता इ.) कारणांमुळे आधुनिक काळात कुटुंबसंस्थेअंतर्गत विविध प्रश्न निर्माण झालेले आहेत. परिणामी कुटुंब विघटन घडून येत आहे.

आज भारतीय समाजात विवाह संस्थेला खूप महत्त्वाचे स्थान आहे. विवाह हा पवित्र संस्कार म्हणून मानला जातो. या पवित्र संस्कारामुळे विवाह संस्थेबरोबर कुटुंबसंस्था ही भक्कम व संस्कारक्षम होत असते. या दोन्ही संस्थांना समाजात विशेष असे महत्त्व आहे. परंतु आधनिक काळात शिक्षण, तंत्रज्ञान, जागतिकीकरणामुळे या दोन्ही संस्थांवर प्रचंड प्रमाणात विपरित परिणाम होत आहेत. त्याबरोबरच नवीन कायदे स्त्रीला मिळालेले कायद्याचे संरक्षण या संरक्षणात्मक कायद्यामुळे स्त्रीकडून मोठ्या प्रमाणात घटस्फोट घेतले जात आहेत. अशा स्वरूपाची संशोधनात्मक मांडणी होणे गरजेचे आहे.

विवाहसंबंधाच्या आधारावर वेगवेगळया कुटुंबातील पुरुष आणि स्त्री हे पती आणि पत्नीच्या नात्याने एकत्र येऊन कुटुंबाची स्थापना करतात. पण प्रत्येक कुटुंबातील सदस्यात

मतभेद आढळतातच. आधुनिक काळात कौटुंबिक तणाव अधिक प्रमाणात आढळून येताना दिसतात. कौटुंबिक तणावाचा परिणाम प्रामुख्याने पती-पत्नीच्या संबंधावर होत असतो. सवयी, उद्देश, ध्येय, अभिरूची, संपत्ती परंतु याशिवायही आर्थिक क्षेत्रातील पत्नीचे स्वातंत्र्य व व्यावसायिक तणाव यामुळे कौटुंबिक तणाव वाढत आहेत. त्यातून परित्याग (Desertion), विलगीकरण (Separation), कुटुंब विच्छेदन (Family Disorganization) इ. समस्या निर्माण होतात.

कुटुंब विघटन ही एक सामाजिक प्रक्रिया आहे, ती कौटुंबिक तणाव, परित्याग व नंतर घटस्फोट या अवस्थेतून जात असते. घटस्फोट ही कुटुंब विघटनाची अवस्था असून घटस्फोटानंतर कायदेशिरित्या कुटुंब व विवाह संपुष्टात येतो.

आज भारतीय समाजात घटस्फोट ही एक सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. पुर्वी आपल्या देशात घटस्फोटाची समस्या तीव्र नव्हती. परंतु शिक्षणाचा प्रसार, मुलीचे शिक्षणातील वाढते प्रमाण, नागरिकरण, औद्योगिकरण, आधुनिकीकरण, सामाजिक मूल्यांतील बदल इ. कारणांमुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. घटस्फोटामुळे पती-पत्नीतील वैवाहिक संबंध संपुष्टात येतात. तसेच कुटुंबाचे विघटनही घडून येते. म्हणून घटस्फोटास कुटुंब विच्छेद (Family Disorganization) असे देखील म्हटले जाते.

मागील दशकामध्ये भारतीय सामाजिक व्यवस्थेत जागतिकीकरण, आधुनिकीकरण व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे बदल होत आहे. याचा परिणाम विवाहसंस्था व कुटुंबसंस्थेवरही होत आहे. विवाहाबद्दलची पारंपरिक मानसिकता बदलून आधुनिक मानसिकता तयार होत आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने आधुनिकीकरण, ओद्योगिकीकरण, आर्थिक स्वयंपूर्णता, माहिती तंत्रज्ञानाचा वापर इ. मुळे विवाहाकडे बघण्याचा तरुणांचा कल बदलत आहे. विवाहपूर्व लैंगिक संबंध व विवाहानंतरचे विवाहबाह्य संबंध याला दिवसेंदिवस सामाजिक मान्यता मिळत आहे. यामुळे विवाह हा पवित्र संस्कार ही संकल्पना बदलून तो आधुनिक युवकांचा अडथळयाचा संस्कार ठरत आहे. तसेच न्यायालयीन निर्णय, स्त्री सबलीकरणविषयक कायदे इत्यादींमुळे विवाहाची प्रासंगिकता पुर्वीच्या तुलनेत कमी होत आहे

सामाजिक जीवनाची एक गरज म्हणून विवाहसंस्था अस्तित्त्वात आली. विवाहसंस्थेमुळे मनुष्याच्या कामवासनेला वैधता प्राप्त करण्यात आली. विवाहाने केवळ रतिसुखच मिळत नसून त्याशिवाय विवाहात वंशवृद्धी, संगोपन, सहजीवन, गृहस्थधर्मपालन

करुन समाजाचे स्थैर्य राखले जाते. पुढे-पुढे विवाहसंस्थेला दीर्घकालीन स्थिरता यावी म्हणून धार्मिक भावनेची त्या बंधनाना जोड देण्यात आली. हिंदू विवाह हा एकदा झाला की कायमचा समजला जातो. म्हणून घटस्फोटास परवानगी नव्हती. ज्यू धर्मात घटस्फोटाचे अधिकार होते. ख्रिश्चन धर्मात पती-पत्नी परस्पर संमतीने घटस्फोट होतो. (कॅथालिकमध्ये मान्य नाही) मुसलमानात विवाह हा करार समजला जातो. इतकेच नव्हे तर तोंडी तलाख मिळतो. घटस्फोटाला पूर्वी 'काडीमोड' किंवा 'सोडचिठ्ठी' असे म्हणत असत.

स्त्रियांच्या अनेक समस्या आहेत. त्या पुरुषप्रधान व सांस्कृतिक, धर्माच्या बंधनातून निर्माण झालेल्या आहेत. देवदासी, घटस्फोटिता, लिंगभेद इ. समस्या स्त्रीच्या शोषणातून झालेल्या आहेत. आधुनिक काळात घटस्फोट ही ज्वलंत समस्या बनली आहे. विवाहाची बंधने शिथिल होत आहे. आधुनिक काळात स्त्रियांना स्वातंत्र्य, सामाजिक मूल्यातील परिवर्तन, आर्थिक स्वातंत्र्य, कौटुंबिक तणाव, विरोधी स्वभाव, जीवन पद्धतीत भिन्न इ. घटस्फोटाच्या पारंपरिक कारणापेक्षा आधुनिक कारणाचा ऊहापोह महत्त्वाचा आहे. त्यात नोंदणी विवाह, जोडीदाराची निवड पसंतीनुसार, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन, स्त्री-पुरुष समान हक्काची संकल्पना, परस्परविरोधी स्वभाव, आवडी-निवडी, स्व-सन्मान (Self respect), आत्मविश्वास, माहिती-तंत्रज्ञान, वाढता व्यापार, कामाच्या वेळेतील बदल, घटस्फोटिताकडे बघण्याचा समाजाचा बदलता दृष्टिकोन इ. आज घटस्फोट ही व्यक्तिची केवळ वैयक्तिक बाब बनली आहे. आर्थिक स्वयंपूर्णता, विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांना मिळत असलेली संमती (औपचारिक) विवाह न करता एकत्र राहणे यास कायद्याची मान्यता, विभिन्न जीवनशैली, आंतरराष्ट्रीय विवाह, इगो व विसंगत अनुरूपता, एकल पालकत्व, बदलती लैंगिक भूमिका, लिंगभावाबद्दलची जागरुकता, सुरक्षित स्त्री जीवन इ. अनेक कारणांमुळे घटस्फोट घेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतात जगाच्या तुलनेत घटस्फोटाचे प्रमाण हे तुलनेने कमी आहे. जवळपास १००० विवाहामागे ११ विवाह मोडतात. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात घटस्फोटाचे प्रमाण कमीत कमी आहे. पण भारतात अजूनही अधिकृत आकडेवारीची नोंद ठेवली गेली नाही. अमेरिकेत ५०% तर भारतात १.१% आहे. पण १९९० नंतर जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे भारतात मेट्रो व अर्ध शहरी भागात घटस्फोटाचे प्रमाण वाढत चाललेले आहे. ते फक्त उच्च वर्ग व

मध्यवर्गातच आहे. साधारणपणे घटस्फोट हे लग्नानंतर पहिल्या किंवा तिसऱ्या वर्षात ८५% होतात. वयोगट हा २५ ते ३५ मध्ये ७०% आहे.

अभ्यास क्षेत्र :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अभ्यासक्षेत्र लातूर जिल्हा घेण्यात आलेले आहे. अभ्यासाच्या उच्च सुशिक्षित विवाहित जोडप्यांतील वाढता घटस्फोट कल आणि त्याचे भारतीय विवाहसंस्थेसमोरील आव्हान हा अभ्यासाचा विषय आहे. लातूर हे मराठवाड्यातील शैक्षणिक हब म्हणून गेल्या दोन दशकापासून पुढे आलेले आहे. लातूर जिल्ह्याची निर्मिती उस्मानाबाद जिल्ह्यामधून १९८२ ला झाली. लातूर जिल्हा हा भौगोलिक आकाराने राज्यात १६ व्या क्रमांकावर येतो तर देशपातळीवर १८१ वा क्रमांक येतो. लातूर जिल्हा हा कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्याच्या सीमेलगत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार लातूरची लोकसंख्या २४५४१९६ आहे. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था मान्यता पावलेल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणातही जिल्ह्याचा नावलौकिक आहे. लातूरमध्ये उच्च शिक्षण देणारी अनेक महाविद्यालये आहेत. ऑक्सिट, राजर्षी शाहू कॉलेज, दयानंद कॉलेज, महात्मा बसवेश्वर कॉलेज, उदयगिरी कॉलेज, शिवाजी कॉलेज, बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज, महिला तंत्रनिकेतन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, लातूर विद्यापीठ उपकेंद्र, एमआयटी मेडिकल कॉलेज, लातूर जिल्हा ३ उपविभागात असून १० तालुके मिळून बनलेला आहे. सदरील संशोधनाचा हेतू सफल व्हावा म्हणून उच्च-सुशिक्षित विवाहित जोडप्यातील वाढता घटस्फोट कल आणि त्याचे भारतीय विवाह संस्थेवर काय परिणाम झाला आहे याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

विषय निवडीमागील भूमिका :

प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व सध्याच्या काळात खूप महत्त्वाचे मानले जात आहे. कारण या समस्येमुळे भारतीय सामाजिक संस्थेच्या अनेक संस्थापैकी एक मूलभूत संस्था मानली जाते त्यामध्ये कुटुंब व विवाह संस्थेला घटस्फोटामुळे फार मोठा धक्का बसलेला आहे. त्यामुळे या विषयावर सविस्तर संशोधन होणे गरजेचे आहे. हा संशोधनासाठी नवीन विषय आहे. समाजशास्त्र विषयात अनेक संशोधने झाली परंतु या विषयावर नव्याने संशोधन होणे गरजेचे आहे असे वाटते. म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. या संशोधनाच्या माध्यमातून घटस्फोटाच्या सुशिक्षित विवाहित जोडप्यातील वाढता कल यांचा समाजशास्त्रीय

दृष्टिकोनातून अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. यामध्ये प्रामुख्याने त्यातून काही सांख्यिकीय व आर्थिक, सामाजिक व मानसिक कारणाचा शोध घेतला जाणार आहे. जेणेकरुन घटस्फोटामागची वास्तविक कारणे तसेच बदलती कारणे याचा शोध घेऊन घटस्फोटावर काही उपाय किंवा मार्गदर्शन करता येईल जेणेकरुन अतिप्राचीन असलेली विवाहसंस्था मोडीत निघणार नाही. यासाठी संशोधनाचे प्रयोजन आहे. सदरील संशोधन हे उपलब्ध साधने व माहिती स्त्रोतांच्या अधिन राहून केले जाणार आहे. त्यासाठी सर्व मर्यादांचे भान ठेवले जाणार आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of the Study):

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व हे भारतीय विवाह संस्थेच्या संदर्भात महत्त्वाचे ठरणार आहे. या संशोधनामुळे बदलत्या सामाजिक परिस्थितीत भारतीय विवाह संस्था व घटस्फोट याबद्दलची उच्च-सुशिक्षित विवाहित जोडप्याची मानसिकता दिवसेंदिवस बदलत चाललेली आहे. हा केंद्रस्थानी विचार लक्षात घेता या सर्व परिस्थितीचा अभ्यास होणे गरजेचे आहे. या संशोधनात घटस्फोट व ती घेण्यामागची बदलती कारणे यांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील विवाहित जोडप्यांचा अभ्यास करून बदलती कारणे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. एकल पालकत्व, लिव्ह इन रिलेशनशिप, सरोगसी मदर, सायबर सेक्स इ. नवीन मूल्यव्यवस्था रूजत आहे. यासंदर्भातले अध्ययन आणि संशोधन पुरेशा प्रमाणात झालेले नाही. आतापर्यंत जे काही संशोधन झाले आहे ते अल्प प्रमाणात आहे.या संशोधनामुळे घटस्फोटाची बदलती मानसिकता अधोरेखित करुन भारतीय समाजाचा विवाह, कुटुंब इ. बद्दलचा दृष्टिकोन समजण्यास मदत होईल. म्हणून हे संशोधन इतर झालेल्या अनेक संशोधनापेक्षा वेगळे असणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही तशी व्यापक होऊ शकते पण संशोधनाच्या सोयीसाठी फक्त विशेषतः उच्चशिक्षित विवाहित नोकरदार, बिगर नोकरदार, स्वयंरोजगार हिंदू, बिगर हिंदू, आंतरजातीय जोडपे तसेच IT, NRI, वैद्यकीय आंतरजातीय जोडप्यांचाच अभ्यास केला जाणार आहे. यासंदर्भात उपलब्ध साधनसामुग्रीच्या मर्यादा समोर ठेऊन प्रस्तुत संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनाचे अभ्यासक्षेत्र लातूर जिल्हा असून लातूर जिल्ह्यातील उच्च सुशिक्षित विवाहित जोडप्यातील वाढता घटस्फोट कल आणि

भारतीय विवाह संस्थेसमोरील आव्हान ही विषयाची व्याप्ती असून लातूर जिल्ह्यातील १०० जोडप्यापुरते हे संशोधन मर्यादित आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives) :

१) कुटुंब विघटनाच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

२) घटस्फोट, विवाह, सुशिक्षित या संकल्पनेचा सैद्धांतिक दृष्टिकोन तपासणे.

३) घटस्फोटाबद्दलची बदलता दृष्टिकोन वा कल आणि कारणांचा अभ्यास करणे.

४) घटस्फोटाबद्दलचा उच्चशिक्षित विवाहित जोडपे यांचा दृष्टिकोन अभ्यासणे.

५) घटस्फोटानंतरच्या कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

६) घटस्फोटाचा भारतीय विवाह संस्थेसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis) :

१) घटस्फोटामुळे सामाजिक भूमिकेत बदलत होत आहे.

२) उच्च सुशिक्षित विवाहित जोडप्यात घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे.

३) माहिती-तंत्रज्ञान आर्थिक स्वावलंबता, वाढत्या स्त्री जाणिवा, कायद्याचे पाठबळ इ. मुळे घटस्फोटाची मानसिकता तयार होत आहे.

४) घटस्फोटामुळे भारतीय कुटुंबसंस्था व विवाहसंस्थेसमोर आव्हान उभे राहिलेले आहे.

५) भारतीय समाजात विशेषतः शहरी भागात घटस्फोटाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

६) घटस्फोट हा वैवाहिक अनुरूपतेच्या बंधनातून मुक्त होत आहेत.

साहित्य सर्वेक्षण (Review of Literature) :

प्रस्तुत साहित्य सर्वेक्षणात ज्या काही अभ्यासकांनी या विषयावरील संशोधन वा ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत. त्याचा उपलब्ध साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

Kapil Deve : (2015) ‘Highly educated couples are quickly parting ways’, Indiatimes.com टाईम्स ऑफ इंडियाच्या बातमीत कपील देवे यांनी गुजरात राज्यातील उच्च न्यायालयात आलेल्या घटस्फोट दाव्यासंदर्भात भाष्य केलेले आहे. त्यात ते म्हणतात की, उच्च-सुशिक्षित विशिष्ट डॉक्टर जोडपे विवाहानंतर काही महिन्यात घटस्फोटासाठी अर्ज करत आहेत. २०१४-१५ मध्ये राज्य महिला आयोगाकडे आलेल्या २००० तक्रारीत केवळ ३०० अर्ज हे घटस्फोटाशी संबंधीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने पुढील कारणे

निदर्शनास आलेली आहेत. विसंगत अनुरूपता, विभक्त जीवनशैली, विचार, संस्कृती व अहंमभाव इ.

Divorce in India, 2015 या वेब पोर्टलमध्ये घटस्फोटासंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यात विविध धर्माचे विवाह, कायदे, घटस्फोटाचा अर्ज, घटस्फोटाची प्रक्रिया, NRI घटस्फोटाची पद्धती, घटस्फोटातील पोटगी, मुले इ.

M.N. Shrinivasan यांनी त्यांच्या ***'Social Change in Modern India'*** या ग्रंथात विवाह पद्धतीबद्दल भारतीय सामाजिक मानसिकता बदलत चाललेली आहे असा निष्कर्ष नोंदविला आहे. त्यामध्ये ते म्हणतात की, सामाजिक गतिशिलतेअंतर्गत संस्कृती व विवाहाच्या पद्धतीत बदल होत आहेत. त्यात त्यांनी आधुनिकीकरण, माहिती तंत्रज्ञान इ. चा ऊहापोह केलेला आहे.

चित्र बॅनर्जी देविकाराणी यांनी त्यांच्या ***'Arrange Marriage Stories'*** या ग्रंथात भारतीय समाजाची स्टीओरोटाईप मानसिकता स्पष्ट केलेली आहे.

कार्यात्मक व्याख्या (Operational definition) :

संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संकल्पनाची निर्मिती व व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

सुशिक्षित (Professional definition)

सुशिक्षीत म्हणजे ज्यांचे शिक्षण हे पदवी व पदव्युत्तर असून जे सेवाक्षेत्रात काम करतात असे तरुण / तरुणीचा समावेश संशोधनाच्या दृष्टीने अभिप्रेत आहेत.

विवाह (Marriage)

विवाह ही मनुष्यनिर्मित कृत्रिम व्यवस्था लैंगिकतेचे शमन व वंशवृद्धीचे कार्य सुविहीतपणे चालावे म्हणून अस्तित्त्वात प्रक्रिया होय.

कुटुंब विच्छेदन (Family disorganization)

घटस्फोटामुळे पती-पत्नीमधील वैवाहिक संबंध संपुष्टात येतात. त्यामुळे कुटुंब विघटन घडून येते म्हणून घटस्फोटास कुटुंब विच्छेद असे म्हणतात.

घटस्फोट (Divorce)

विवाहबंधानतून कायदेशीर मुक्तता म्हणजे घटस्फोट होय.

अभ्यास विषय क्षेत्र (Study Universe)

प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासाचा विषय हा उच्च-सुशिक्षित नोकरदार (विशेषतः सेवाक्षेत्रातील) विवाहित जोडपे असणार आहेत. ज्यात आंतरजातीय, आय.टी. क्षेत्रातील, आंतरराष्ट्रीय विवाह, वैद्यकीय व सामान्य पदवीधर जोडपे इ. चा समावेश असेल. कारण याच वर्गात घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे.

अभ्यासाचे चल (Variable & Study)

प्रस्तुत संशोधनात विवाहसंस्था व घटस्फोट हे परावलंबी चल असून बदलती जीवनशैली, आर्थिक स्वयंपूर्णता, व्यक्तिस्वातंत्र्य, समाजाची बदलती मानसिकता, न्यायालयाचे निर्णय, स्त्री सबलीकरण, माहिती-तंत्रज्ञान इ. हे स्वतंत्र चल आहेत.

संशोधन आराखडा (Research Design)

सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व निदानात्मक संशोधन आराखडा (Diagnosis Research Design) या दोन आराखड्याचा संयुक्तरित्या वापर करण्यात येईल. पहिल्या आराखड्यातून समस्येचे ज्ञान करून घेतलेले आहे व दुसऱ्या आराखड्यातून गृहितकृत्याद्वारे समस्येवर अध्ययन करून निष्कर्ष काढलेले आहेत.

नमुना निवड प्रक्रिया (Sampling)

प्रस्तुत संशोधनासाठी पाच वेगवेगळ्या क्षेत्रातील उच्च-सुशिक्षित विवाहित जोडप्याची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी गैर-संभाव्य नमुना निवड हा प्रकार निवडला जाणार आहे. त्यात सहेतुक निवड पद्धत असणार आहे. या सर्व जोडप्याची मुलाखत, प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केली जाणार आहे. सर्व मुलाखतीस प्रतिसाद दिलेल्या जोडप्याचे वयोगट, शिक्षण, व्यवसाय, जात, धर्म, शहरी, ग्रामीण, लग्नाचे वय याद्वारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. एकत्रित केलेल्या माहितीचे संख्यात्मक व आलेखीय विश्लेषण करण्यात येईल.

तथ्य संकलन (Data Collection)

सामाजिक संशोधनात वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन केले जाते. कोणत्याही घटनेच्या संदर्भात वास्तविक तथ्य संकलित करून आणि त्या तथ्याच्या आधारावर सिद्धांताचे प्रतिपादन केले जाते. संपूर्ण संशोधन हे तथ्य संकलनावर अवलंबून असते. त्या तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. तथ्यांचे स्त्रोत आणि स्वरूप या आधारावर तथ्यांचे मुख्यतः दोन प्रकार आहेत.

प्राथमिक स्त्रोत (Primary Source) :

क्षेत्रीय शोध पद्धतीने माहिती मिळविली जाणार आहे. प्रत्यक्ष स्त्रोत पद्धती मुलाखत अनुसूची याचा वापर करून ५० जोडप्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

दुय्यम स्त्रोत (Secondary Source) :

प्राथमिक स्वरूपाच्या माहितीतील वस्तुनिष्ठता तपासून पाहण्यासाठी व प्राथमिक तथ्यांना वस्तुनिष्ठतेचा पुरावा देण्यासाठी म्हणून या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात येणार आहे. दुय्यम स्त्रोतांचा एक भाग म्हणून संशोधन प्रबंध, ग्रंथ, लेख, साहित्य, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, न्यायालयीन निर्णय, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे इ. द्वारे माहिती संकलित केली जाणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण (Analysis and Interpretation of Data) :

माहिती संकलन केल्याने संशोधन पूर्ण होत नसून त्यासाठी माहितीचे उद्देशानुरूप विश्लेषण केले पाहिजे. वरील गृहितकानुसार प्रबंधात मांडलेल्या गृहीतकृत्याची पडताळणी करून निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी पुढील पद्धत अवलंबिलेली आहे. १) तथ्यांचे परीक्षण २) तथ्यांचे वर्गीकरण ३) तथ्यांचे सांकेतिकीकरण ४) सारणीकरण आणि ५) पृथ्थकरण

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले

<u>भारतीय समाज व्यवस्था व कुटुंबसंस्था</u>

प्रस्तुत प्रकरणात भारतीय समाजव्यवस्थेची रचना, वैशिष्ट्ये, आधार याचा अभ्यास केला जाणार आहे. कारण भारतीय समाज हा विविधता व पारंपरिक मूल्यावर आधारित समाजव्यवस्था आहे. भारतात अनेक जाती आहेत. प्रत्येक जातीची एक वेगळी संस्कृती आहे. भारतात आदिवासी, ग्रामीण व शहरी समुदाय आहेत. भारतीय समाजात विवाह व कुटुंब या फार महत्त्वाच्या प्राथमिक संस्था आहेत. या संस्थेशिवाय व्यक्ति राहू व विकसित होऊ शकत नाही. म्हणून या प्रकरणात भारतीय समाजव्यवस्थेचा संपूर्ण अभ्यास व आढावा घेतला जाणार आहे. संशोधनाच्या दृष्टिकोनातून हे प्रकरण प्राथमिक स्तरावर खूप महत्त्वाचे आहे.

प्रकरण दुसरे

भारतीय विवाह संस्था व तिचे स्वरूप

भारतीय समाजव्यवस्थेच्या प्राथमिक संस्थेपैकी विवाहसंस्था ही एक आहे. विवाहाशिवाय प्रगत किंवा अप्रगत समाजाची कल्पनाच करता येत नाही. स्त्री-पुरुषाच्या लैंगिक संबंधाना सामाजिक मान्यता देणे हाच विवाहाचा एकमेव उद्देश नसून प्रजोत्पादन, संगोपन व सहजीवन अपेक्षित आहे. प्रस्तुत प्रकरणात घटस्फोटाच्या अनुषंगाने भारतीय समाज व भारतीय विवाहसंस्था व कुटुंबसंस्थेचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. विवाहाची पारंपरिक स्वरूप व भूमिका बदलत आहे. विवाहासंदर्भात बदलत्या संदर्भात नवीन व्यवस्था रूजत आहे. म्हणून विवाहविषयक सर्व बाबींचा तसेच विविध धर्मातील विवाह करण्याच्या पद्धती, प्रकार इ. अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे

विवाह व घटस्फोटविषयक विविध कायदे

प्रस्तुत प्रकरणात विवाहाची माहिती म्हणजे पद्धत, प्रकार व बदलते दृष्टिकोन यांचा अभ्यास तसेच विविध धर्मातील विवाहविषयक दृष्टिकोन, विवाहाचे प्रकार, घटस्फोटाची पद्धत, विवाह व घटस्फोटविषयक कायदे यांचा अभ्यास केला जाणार आहे. ज्यामुळे प्रस्तुत संशोधनास विवाह या संकल्पनेचा पूर्ण ओळख होण्याच्या दृष्टीने या प्रकरणाची मदत होईल.

प्रकरण चौथे

उच्च सुशिक्षित जोडप्यातील घटस्फोटाची कारणमिमांसा

आधुनिक काळात विवाहविषयक दृष्टिकोन बदलत चाललेला आहे. त्यासंदर्भात आधुनिक शिक्षण, मूल्यातील बदल, बदलती जीवनशैली, नागरिकरण, व्यक्तिवाद, समता, मानवी हक्काची जागरूकता, आर्थिक स्वयंपूर्णता, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, वैयक्तिकतता इ. कारणामुळे विवाहसंस्थेत बदल होत आहेत. ज्यातून कुटुंब विच्छेन म्हणजेच घटस्फोटासारख्या घटना यांचे प्रमाण वाढत आहे. विशेषतः सुशिक्षित व सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या विवाहित जोडप्यात यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात घटस्फोटामागच्या पारंपरिक कारणापेक्षा नवीन कारणाचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

घटस्फोटाची विवाहसंस्थेसमोरील आव्हाने व परिणाम

या प्रकरणात घटस्फोटाच्या वाढत्या कलामुळे विशेषतः उच्च-सुशिक्षित विवाहित जोडप्यात विवाहसंस्थेसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. विवाहसंस्थेचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत आहे. विवाह न करणारी ही विवाहपूर्वक लैंगिक संबंध ठेवता येणे व विवाह करून विजातीय जोडीदाराऐवजी विवाहबाह्यसंबंध प्रस्थापित करणे यास समाजमान्यता मिळत आहे. त्यामुळे विवाहाची प्रासंगिकता दिवसेंदिवस कमी होत आहे. विवाह हा पवित्र संस्कार न राहता ती एक नको असलेली अनिवार्य गरज बनत चालली आहे. परिणामी विवाहसंस्था मोडीत निघत आहे. त्याचे मानवी जीवनावर गंभीर असे परिणाम होत आहेत असे की, बलात्कार, एकाकी जीवन, मुलाबाळाची आबाळ, एकल पालकत्व, असुरक्षितता इ. संभाव्य परिणाम समोर येत आहेत. सदरील सर्व मुद्यांचा परामर्श या प्रकरणात सविस्तरपणे घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व सूचना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाअंती संशोधन आराखडा व तथ्य संकलन व गृहीतकृत्यांवरुन काही निष्कर्ष मांडले जाणार आहेत. तसेच काही सूचना करण्यात येणार आहेत. शेवटी संदर्भ ग्रंथांची सूची देऊन परिशिष्ट्ये जोडण्यात येतील.

संदर्भ

- विद्युत भागवत (२०१३) : विवाहसंस्था नामशेष होणार काय?
  स्त्रियांचे मराठीतील निबंध लेखन
  साहित्य अकादमी, नई दिल्ली, पृ.५८ ते ६१
- आगलावे प्रदीप (२०११) : भारतीय समाज, संरचना आणि समस्या
  साईनाथ प्रकाशन, औरंगाबाद
- Kumud Desai (1981) : Indian Law of Marriage and Divorce
- Charles Colin Mac (1971): The Law of divorce in India
  Being the Indian Divorce Act, Culcutta
- Werner Menski (2013) : Modern Indian Family Law,

New Delhi
- Joel A. Nichols (2011): Marriage and Divorce in a Multi-culrural Context, Madras
- N.S. Krishnakumari (1988) : Status of Single women in India : A Study of Spinster.
- M.A. Elliot & F.E. Marill (1950) Social Disorganization, Harper & Brothers, New York
- E.R. Mower (1943) : Dis-organization personal & social
- Ram Ahuja (1999) : Society in India, Rawat Publication, Jaipur
- Kapil Deve (2015) : Highly educated couples are quickly parting ways, India Times, July-14, New Delhi.
- N.A. (2015) Divorce in India, www.indivorce.com retrieved in 2015

Webliography

- www.marathimatrimony.com
- www.kanoon.com
- www.ncbi.nih.gov.in

संशोधक मार्गदर्शक
डॉ.एस.पी. गायकवाड
उपप्राचार्य व समाजशास्त्र विभागप्रमुख
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

संशोधक
वर्षा भूषण कांबळे
एम.ए. (समाजशास्त्र), सेट